## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.३५७/२०१८ मधील
## निशाणी क्र.२१ वर आदेश
**CNR-MHLA110014052018**

---

०१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ व कलम १५१ खालील तरतुदीनुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रकरण प्रलंबित असताना दावा मिळकतीपैकी काही मिळकत शासनाने संपादीत केलेली आहे. त्यामुळे त्याअनुषंगाने दाव्यामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार नसुन प्रस्तावित दुरुस्तीद्वारे पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची वादीने शेवटी विनंती केलेली आहे.

०२. सदर अर्जाला प्रतिवादी क्र.२ ने म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही. सदर प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार असल्यामुळे अर्ज चालु शकत नाही. तसेच अर्जामध्ये शासनाने जमीन कधी संपादीत केलेली आहे हे नमुद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची सदर प्रतिवादीने शेवटी मागणी केलेली आहे.

०३. सदर अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरिता मी खालील मुद्दे विचारात घेतले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात नमुद प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे का? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>**का र ण मी मां सा**</u>

०४. सदर प्रकरणातील पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

<u>**मुद्दा क्र.१ करिता**</u> –

०५. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादीने जाहीर करुन मिळण्याकरिता, मिळकतीचा कब्जा मिळण्याकरिता व दरम्यानचे उत्पन्न मंजूर करण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.२ ने कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रकरणामध्ये मुद्दे काढण्यात आलेले आहेत. सदर प्रकरण वादीच्या पुराव्याकरिता प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रकरण

अंशतः सुनावणीकरिता प्रलंबित नसल्याचे स्पष्ट होते.

०६. सदर अर्जाद्वारे वादी ही दाव्यामध्ये मिळकतीमधील क्षेत्राच्या संपादनाबाबत व त्याच्या नुकसान भरपाईबाबत दाव्यात कथन करु ईच्छीत आहे. त्यामुळे याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, केवळ वादीने मिळकतीमधील क्षेत्राच्या संपादनाबाबत व त्याच्या नुकसान भरपाईबाबत दाव्यात अतिरीक्त कथन केल्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होत नाही. याउलट पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरिता व प्रकरणाची संख्या टाळण्याकरिता अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास वादीला परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींना दुरुस्तीबाबत बचाव मांडण्याची संधी मिळणार आहे. तसेच सदरचा अर्ज नामंजुर केल्यास प्रकरणामध्ये गुंतागूंत वाढुन प्रकरणाची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वादीचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर दाव्याचे स्वरुप, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करिता –**

०७. वर नमुद चर्चेवरुन स्पष्ट होते की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र

आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. नि.क्र.२१ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे मूळ दाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.01.21 17:10:51 +0530

(शिवकांत म. गौरगोंड)

दि.२१.०१.२०२०. सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.